# प्रादेशिक बोलींचे भाषाविज्ञान

डॉ. संजय लोहकरे

Prashant

Scanned by CamScanner

**प्रादेशिक बोलींचे भाषाविज्ञान**

© संजय यशवंत लोहकरे

केळी ओतूर, ता. अकोले, जि. अहमदनगर-४२२६१०
मो. ९६५७५४९०७६
E-mail : phadki@rediffmail.com

प्रकाशक व मुद्रक : रंगराव पाटील
कार्यालय : प्रशांत पब्लिकेशन्स, ३, प्रताप नगर, श्री संत ज्ञानेश्वर मंदिर रोड,
नूतन मराठा महाविद्यालयाजवळ, जळगाव ४२५००१.
दूरध्वनी : (०२५७) २२३५५२०, २२३२८००
ईमेल : prashantpublication.jal@gmail.com
प्रथम आवृत्ती : जानेवारी, २०१९ ISBN : ९७८-९३-८८७६९-११-२
अक्षरजुळवणी : प्रशांत पब्लिकेशन्स मूल्य : ₹ ५५०

या पुस्तकाचे सर्व अधिकार प्रकाशकांनी स्वत:कडे राखून ठेवलेले आहेत. लेखांचे अधिकार प्रकाशक आणि संबंधित लेखकाधीन समान असून शोध निबंधातील मते ही संबंधित लेखाच्या लेखकांची वैयक्तिक मते आहेत. त्या मतांशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

Prashant

या पुस्तकातील कोणताही मजकूर, कोणत्याही स्वरूपात वा माध्यमात पुनर्प्रकाशित अथवा संग्रहित करण्यासाठी लेखक आणि प्रकाशक दोघांचीही लेखी पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे.

www.prashantpublications.com



Scanned by CamScanner

# ..अनुक्रमणिका..

१. कोरकू बोली: वर्णनात्मक अभ्यास ....................................१३
डॉ. काशीनाथ बऱ्हाटे

२. डांगाणातील आदिवासी महादेवकोळी बोली : एक सांस्कृतिक संचित .....४४
प्रा. वाय. डी. भांडकोळी

३. कोल्हापुरी संस्कृती आणि कोल्हापुरी बोली....................................८१
प्रा. विजय कुमार शा. रेंदाळकर

४. बंजारा बोलीचा भाषावैज्ञानिक अभ्यास....................................८६
प्रा. डॉ. सुनील आनंदराव राठोड

५. गोंडी बोलीचा भाषावैज्ञानिक अभ्यास....................................९८
नंदकिशोर नैताम, मु. मालदुगी

६. देहवाली बोली....................................११७
डॉ. अरविंद सुरवाडे

७. भिलाऊ बोलीचा भाषावैज्ञानिक अभ्यास....................................१२०
सुनील गायकवाड

८. महाराष्ट्रातील आदिवासी कोकणी कोकणा बोलीचा भाषाशास्त्रीय अभ्यास....................................१४२
प्रा. मधुचंद्र लक्ष्मण भुसारे

९. आगरी बोली ....................................१६०
प्रा. जयेश सुरेश म्हात्रे

१०. खानदेश वैखरी : अहिराणी ....................................१६९
प्रा. डॉ. फुला बागुल

११. कातकरी बोलीचा भाषावैज्ञानिक अभ्यास ....................................१८४
प्रा. चिंतामण धिंदळे, कु. विजया ठाकूर

१२. तावडी बोलीचा भाषावैज्ञानिक अभ्यास....................................१९३
सुनील गायकवाड, चाळीसगांव



Scanned by CamScanner

# बंजारा बोलीचा भाषावैज्ञानिक अभ्यास

प्रा. डॉ. सुनील आनंदराव राठोड

बंजारा समाजाचे जीवन काही विशिष्ट संस्थांच्याद्वारे चाललेले असते. व्यक्तीच्या सवयीप्रमाणे समाजालाही आपले जीवन व्यवस्थीतरीतीने चालवण्यासाठी काही सवयी आवश्यक असतात. कुटुंब, विवाह, शिक्षण, राजव्यवहार इत्यादी समाजिक संस्थांचा अभ्यास केला म्हणजे या सवयींचे स्वरुप लक्षात येते. व्यक्तीव्यक्तींचे व्यवहार भाषेच्या द्वारे शक्य होते, म्हणून भाषा ही सर्व श्रेष्ठ सामाजिक संस्था आहे असे ना. गो. कालेलकर म्हणतात. कारण इतर सर्व संस्था चालवण्यासाठी समाजातील सर्व व्यक्तींना एकत्र येणे, एकमेकांचे विचार समजून घेणे गरजेचे असते. आपले अनुभव किंवा साधन म्हणजे भाषा. भाषेशिवाय सामाजिक व्यवहार केवळच अशक्य आहे. भाषेमुळेच ज्ञानाचे हस्तांतरण होते. ज्ञान भंडार समृध्द होते म्हणून भाषा हे मावनी प्रगतीचे सर्वश्रेष्ठ साधन आहे असे ना. गो. कालेलकर म्हणतात.

भाषा हे ध्वनिरुप साधन आहे. ध्वनीला विशिष्ट वळण देवून मानव अर्थवाहक संकेत निर्माण करतो. आणि हे संकेत एका विशिष्ट रुपात एका विशिष्ट क्रमाने मांडून विचार व्यक्त करतो, यालाच वर्ण शब्द आणि विधान असेही म्हणता येईल. भाषा ही विधानरुपाने आपल्या समोर असते. तिचे पृथःक्करण करता करता शब्द आणि वर्ण आपल्या हाती येतात. वर्णांनी बनलेले शब्द आणि त्या शब्दांनी व्यक्त होणारा अर्थ यात नैसर्गिक संबंध नसतो. आणि म्हणूनच जगातल्या सर्व भाषांत प्रत्येक अर्थ सारख्याच ध्वनींनी व्यक्त होत नाही. जगातील भाषा भिन्नभिन्न असण्याचे हे महत्त्वाचे कारण होय.

आज जगभरात असंख्य बोलीभाषा बोलल्या जातात. या बोलीभाषेतील शब्द संचारी असतात. ते आपली जागा बदलवत असतात. त्यामुळे वेगवेगळ्या मावनी समाजातील शब्द वेगवेगळ्या मानवी समाजात बेमालूमपणे मिसळून गेलेले असतात. या संदर्भात डॉ. मु. श्री. कानडे आपल्या 'मराठीचा भाषिक अभ्यास ऐतिहासिक आणि वर्तनात्मक' या पुस्तकात म्हणतात, 'कोणतीही भाषा एकाएकी उद्‌भवत नाही. भाषेच्या जन्माची प्रक्रिया प्रदीर्घ काळ चालू असते. आज प्रचलित असलेल्या भाषेला अनेक शतकांचा इतिहास लाभलेला असतो. भाषेच्या इतिहासाचा अभ्यास करणे म्हणजेच तिची पूर्वपीका जाणून



घेणे होय. कधी भाषेतील शब्दांचे औपचारिक स्वरूप बदलते, तर कधी अर्थ बदलतो. काही अन्य भाषांशी संबंध आल्यामुळे नवे शब्द भाषेत स्वीकारले जातात, तर काही भाषिक परिवर्तनामागे अनेक कारणे संभवतात. अशा परिवर्तनातूनच एका भाषेतून दुसरा भाषा निर्माण होते. मात्र नवी भाषा पूर्वभाषेपेक्षा पूर्णतः वेगळी नसते. पूर्व भाषेची अनेक वैशिष्ट्ये तिच्यात कायम राहतात. पूर्व भाषा आणि तिची उत्तरकालीन अवस्था यांच्यामध्ये ध्वनी, व्याकरण आणि शब्दसंग्रह या सर्व पातळ्यांवर साधर्म्य आढळते. भाषेची उत्तरकालीन अवस्था तिच्या पूर्वकालीन अवस्थेवर मोठ्या बदलाची व नवी भाषा निर्माण होण्याची कारणे स्पष्ट होतात.'

एखादी बोलीभाषा निर्माण होण्यासाठी जवळपास ३०० वर्षे तो मानव समूह एकत्रित राहावयास पाहिजे. बंजारा बोलीभाषा अशीच निर्माण झाली असावी. बंजारा हा रानोमाळ भटकणारा लोकसमूह होय. या भ्रमंतीच्या काळात या लोकसमूहाचा विविध भाषिकांशी संपर्क आला. त्यामुळे त्या-त्या भाषेतील प्रचलित शब्द या लोकसमूहाने स्वीकारले. पण हे एकतर्फी घडले नाही. हा भाषिक व्यवहार दुतर्फी झाला. बंजारा जमातीने इतर भाषिकांचे लोकप्रिय शब्द स्वीकारले, त्याच वेळी इतर शब्दांचा स्वीकार केला म्हणून या बोलीभाषेत अनेक भाषेत शब्द सापडतात. संस्कृत, मराठी, गुजराती, राजस्थानी, मारवाडी, हिंदी या सर्व भाषेतील अनेक शब्द या बंजारा बोलीभाषेत आलेले आहेत.

बंजारा बोलीभाषेचा भाषावैज्ञानिकदृष्ट्या अभ्यास करताना एक गोष्ट प्रामुख्याने जाणवते ती ही की, या बोलीभाषेतील सर्व शब्द एकाच वळणाचे नाहीत. काही समान लयीचे शब्द या बोलीभाषेत अतिक्रमण करताना आढळतात. या भाषिक स्थित्यंतराचे कारण शोधताना बंजारा हा रानोमाळ भटकणारा लोकसमूह होय. या भ्रमंतीच्या काळात या लोकसमूहाचा विविध भाषिकांशी संपर्क आला व कालांतराने तो स्थिर झाला. आज बंजारा लोक त्या भागातील स्थानिकांची भाषा बोलतात व त्यामुळे त्या भाषेचा विशिष्ट उच्चार बंजारा बोलीभाषा बोलताना त्या स्थानिकांच्या बोलण्यात जाणवतो. जसे महाराष्ट्रात मराठी, गुजराथ मध्ये गुजराथी, राजस्थानात ऱाजस्थानी, मध्यप्रदेशात हिंदी, कर्नाटक मध्ये कानडी, आंध्र मध्ये तेलंगू शब्द बंजारा भाषेने ग्रहन केले आहेत. तरीही बंजाराचे अस्सल शब्द आजही रुढ आहेत. ते तत्सम, तद्‌भव किंवा परभाषिही नाहीत. मराठीतील 'काम' हा शब्द संस्कृत भाषेतील कर्म या शब्दाच्या मूळरुपात बदल होऊन मराठी भाषेत आलेला आहे. मराठीतील 'कर्म' हा शब्द व्याकरण दृष्ट्या तद्‌भव या शब्दसिध्दीत मोडतो. म्हणून बंजाराबोलीत काम या अर्थानि आलेला 'हादो' हा शब्द मूळदेशी ठरतो.

बंजारा बोलीतील 'खड' हा शब्द मराठीतील 'गवत' या अर्थानि येतो तर मराठीतील गवत हा शब्द संस्कृत 'ग्रास' या शब्दाचा अपभ्रंश रूप होय. तेव्हा बंजाराबोलीतील 'खड' हाही शब्द मूळदेशी असल्यास नवल वाटायला नको.

मराठीतील 'रविवार' या शब्दाला बंजाराबोलीतील 'दितवार' असा पर्यायी शब्द



Scanned by CamScanner

## लेखक परिचय



### डॉ. काशीनाथ विनायक बऱ्हाटे

सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमु, स्व. छगनलाल मुलजीभाई कढी कला महाविद्यालय, अचलपूर, कॅम्प परतवाडा, ता. अचलपूर, जि. अमरावती. संपर्क :-०९४२०१२४७१०४, ०७२२३-२२३२१४

- » संशोधन कार्य- पीएच.डी. प्रबंध- 'कोरकू बोली : वर्णनात्मक आणि समाजभाषा वैज्ञानिक अभ्यास'. लघुशोध प्रबंध - 'बहिणाबाई चौधरी: व्यक्तित्व आणि कवित्व' लघुसंशोधन प्रकल्प-(विद्यापीठ अनुदान आयोग)'कोरकू बोलीची व्याकरणिक संरचना' बृहद् संशोधन प्रकल्प - (विद्यापीठ अनुदान आयोग) 'ऑस्ट्रोएशिएटिक भाषापरिवाराच्या मुंडा गटातील भाषांचा तौलनिक अभ्यास'
- » ग्रंथनिर्मिती-१) 'कोरकू बोली: वर्णनात्मक आणि समाजभाषा वैज्ञानिक अभ्यास',देवयानी प्रकाश, मुंबई. २) आगामी 'कोरकू: समाज, संस्कृती आणि लोकसाहित्य', अथर्व पब्लिकेशन, धुळे ३) 'कोरकूंचे लोकसाहित्य', अथर्व पब्लिकेशन, धुळे



### प्रा. यशवंत ढवळा भांडकोळी

सहायक प्राध्यापक-मराठी,सेठ ज.नौ. पालीवाला वाणिज्य, विज्ञान व कला महाविद्यालय, पाली-सुधागड जि. रायगड

- » महाविद्यालयातील वाङ्मय मंडळ, सांस्कृतिक विभाग, ग्रंथालय समितीत कार्यरत
- » सध्या 'मराठी जैन कथांचा चिकित्सक अभ्यास' या विषयावर पीएच.डी.साठी संशोधन सुरु आहे.
- » मूळ गाव- रा. लव्हाळी ओतूर ता. अकोले जि. अहमदनगर संपर्क : ९४२०९६४६७२



### विजयकुमार शामराव रेंदाळकर

देवचंद महाविद्यालय,अर्जुननगर, ता. कागल, व्हाया निपाणी, जि.कोल्हापूर, शिक्षण:- एम.ए.(नेट)

- » देवचंद कॉलेज अर्जुननगर येथे वरिष्ठ महाविद्यालयात २३ वर्षे मराठी विषयाचे अध्यापन व मराठी विभाग प्रमुख. अनेक नियतकालिकांतून कथा लेखन, महाविद्यालयात सांस्कृतिक विभाग प्रमुख, युवा महोत्सवाकरिता पथनाट्याचे लेखन, परिवर्तनवादी साहित्य संमेलन, निपाणी येथे संयोजन समितीवर सदस्य. शाहू-फुले-आंबेडकर चळवळीत सहभाग.





### प्रा. डॉ. सुनील आनंदराव राठोड

श्री वसंतराव नाईक कला व श्री. अमरसिंग नाईक महाविद्यालय, मंगरूळपीर, जि.वाशिम

- » ग्रंथ :- बंजारा जमात लोकजीवन आणि लोकगीते
- » पुरस्कार:- बंजारा भूषण-२००७, शांतीदूत विद्यारत्न पुरस्कार-२००७
- » लेख:- राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय, मासिक तसेच पुस्तकातून तीस शोधनिबंध प्रकाशित



### नंदकिशोर डूकरूजी नैताम

एम.ए. (मराठी, समाजशास्त्र)
मु. मालदुगी, ता. कुरखेडा, जि.गडचिरोली (म.रा.)
संपर्क : ९४०४२२१९८८/९४२०१४३६९५
nandakishor750@rediffmai.com

- » प्राथमिक शिक्षक, सध्या जि.प. उच्च प्राथ. केंद्र शाळा मुरुमगांव पं.स.धानोरा,जि.गडचिरोली.
- » कार्य : गोंडवानाच्या विविध कार्यक्रमात प्रबोधन, विविध वृत्तपत्र, मासिक, स्मरणिका, साप्ताहिक, पाक्षिक इत्यादी मधून सातत्याने लेखन, साहित्य संमेलन, कवीसंमेलनात भाग.
- » आवड, वाचन, लेखन, सामाजिक कार्य, वर्क्तृत्व, पर्यटन.



### डॉ. अरविंद सुरवाडे

ब्लॉक ए-१८०/३६०, करूणा सह.गृह.संस्था, दादासाहेब गायकवाड चौक, उल्हासनगर, जि.ठाणे,पीन-४२१००४ संपर्क : ९८६९९२१६०३

- » प्रकाशित पुस्तके:-१) धम्मचक्र प्रवर्तन : फलश्रुती आणि आव्हाने २) बुद्धाचे अर्थशास्त्र ३) समकालीन आंबेडकरी कथा (अनुवाद)
- » आगामी-१) बुद्धाचे अर्थकारण: प्रयायी अर्थनीती
- » अनुवाद-१) मलक (कादंबरी) दलपत चौहान २) आंबेडकरवादी प्रेमकथा,
- » सांप्रती- दिव्यांगजन सशक्तीकरण विभाग, सामा.न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकारच्या सेवेत.



Scanned by CamScanner

बोली आणि भाषा या देशाची विरासत आहे. भाषा हे समाजव्यवहाराचे महत्त्वाचे साधन आणि सामाजिक संस्था असल्याने बोली समाजव्यवहारात घट्ट रुतून बसल्या आहेत. मानव जातीच्या प्रगतीचा इतिहास बोलींमध्ये दडून बसला आहे. महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री मा. यशवंतरावजी चव्हाण यांनीही बोलींचे महत्त्व ओळखून 'बोली या ज्ञानभाषा झाल्या पाहिजेत' असे महत्त्वपूर्ण उद्‌गार काढले होते, आणि ११ जानेवारी १९६५ ला 'मराठी' ही महाराष्ट्राची राजभाषा झाल्यानंतर, हिचे पुत्र आम्ही हिचे पांग फेडू। हिला बैसवू वैभवाच्या शिरी' ही माधव ज्युलियनांची भविष्यवाणी खरी ठरविण्यासाठी राजकीय पातळीवरही पाऊले उचलली गेली होती. ज्या मराठी भाषेला वैभवाच्या शिरावर बसविण्याची शपथ घेतली होती, त्या मराठी राजभाषेची आणि तिला समृद्ध करणाऱ्या तिच्या दीडशेहून अधिक बोलींची काय अवस्था आहे हे ही समजून घेतले पाहिजे. मराठीला ५२ बोली आहेत असा दावा मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देण्यासाठी प्रस्ताव तयार करणाऱ्या समितीने केला आहे. प्रत्यक्षात मराठीला १५० हून अधिक बोली आहेत. मराठी भाषेला समृद्ध करणाऱ्या तिच्या बोली नष्ट झाल्या तर त्या बोलीतील शब्दांचे अर्थ आणि भावना नष्ट होतील. मराठी भा[illegible]विध अर्थ आणि भावनांविना लुळीपांगळी होऊन परकीय भाषा तिच्यावर आक्र[illegible]ल. आज महाराष्ट्रात मराठीवरील इंग्रजीचे आक्रमण वाढते आहे. ते रोखण्यासाठी, मराठीला अधिक समृद्ध करून ती जगाची ज्ञानभाषा होण्यासाठी तिच्या बोलींना जपणे व त्यांचे संवर्धन करणे महत्त्वाचे आहे. 'प्रादेशिक बोलींचे भाषाविज्ञान' हा महाराष्ट्रातील सत्तावीस प्रादेशिक बोलींचे भाषिक सौंदर्य, बोलींचे समाजशास्त्र, बोलीविज्ञान व व्याकरण व्यवस्था जपणारा आणि संवर्धन करणारा महत्त्वाचा ग्रंथ आहे.

Prashant

मराठी वाङ्मय ₹ 550

ISBN 978-93-88769-11-2

9 789388 769112

www.prashantpublications.com
prashantpublication.jal@gmail.com

Scanned by CamScanner